International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# कामगार शेतकरी समाजजीवन आणि अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी

**डॉ. सयाजीराव छबुराव गायकवाड**
मु.पो.वाघोली, ता. माळशिरस, जि.सोलापूर
*Corresponding Author - डॉ. सयाजीराव छबुराव गायकवाड*
**Email** - dr.sayajiraocgaikwad@gmail.com
**DOI - 10.5281/zenodo.7353383**

महाराष्ट्रात गोंधळी, भराडे, दांगट, वासुदेव, पांगुळ यासारखे पारंपरिक रुढी परंपरांचे जतन करणारे लोककलावंत गाणे बजावणे करत होते. तत्कालीन विरश्रींचा पराक्रम, विलास, समाजजीवन, धार्मिक विधी परंपरा यांच्यातून शाहिरी काव्यास स्फूर्ती चढू लागली होती. यातूनच पुढे शाहिरी वाड्मय विकसीत झाले आहे. मराठ्यांच्या जीवनाचे, भावभावनांचे अस्सल रसभरीत चित्रण करणे हेच पुढे शाहिरांचे जीवित कार्य झाले. त्यामुळे शाहिरांना लौकिक प्रवृत्तीचे कलावंत मानले जाते. मानवाचे जीवन त्यातील सत्य, गुण-दोष, वृत्ती-प्रवृत्तींवर भाष्य शाहिरी वाड्मयाने केले आहे. वाड्मय म्हणून आवश्यक असणारे सर्व गुणविशेष या वाड्मयात आहेत. त्यामुळे एकूण मराठी वाड्मयात शाहिरी वाड्मयाचे स्थान अनन्यसाधारण असे आहे.

शाहिरांची कला ही लोककला आहे. म्हणून शाहिरांनी लिहिलेल्या रचना-काव्य हे सुद्धा लोककाव्यच आहे. लोकांसाठी लिहिणारे लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या पोवाड्यांनी जो लोकमानस जागा केला आहे, त्या लोकमानसाला लोकशाहीत जगण्यासाठी पोषक बनवण्याचे काम या लोककलावंताने केले आहे. आज आण्णा भाऊ साठे यांचे साहित्य जागतिक दर्जाला पोहोचले, त्याचे गमक त्यांच्या विचारामध्ये, लेखणीमध्ये आहे.

### कामगार जीवन:

दलित-शोषित-कष्टकरी-शेतकरी यांना साहित्याच्या माध्यमातून जनतेसमोर उभे करणाऱ्या आण्णा भाऊंच्या प्रतिभेने तेलंगणमधील कष्टकरी जनतेने दिलेल्या अभूतपूर्व लढ्याला साथ करण्याचे आवाहन ‘तेलंगणचा संग्राम’ या पोवाड्यातून केले आहे. ‘कसेल त्याची जमीन’ हा कायदा करावा आणि सर्व शेतीचे कष्टकऱ्यांत समान वाटप व्हावे ह्या आग्रहाखातर बंडाचा झेंडा हातात धरुन न्याय मागणाऱ्या जनतेला बघून आण्णा भाऊंनी हा पोवाडा रचला. तेलंगणामधील लढाऊ शेतकऱ्याला मदत

करण्याचे आवाहन मुंबईमधील कामगार व युवकांना केले आहे. निझामाच्या विरोधात जनमत जागृत करुन दिलेला हा लढा म्हणजे केवळ तेलंगणचा उठाव नसून चाळीस लाख जनतेचा मुक्तीसंग्राम आहे. कष्टकरी जनतेच्या आशा आणि आकांक्षेचा हा नवा लढा म्हणजे पेटता पलिता आहे. अशा शब्दांत त्यांनी तेलंगणाच्या युद्धाला वर्गयुद्धाचे शास्त्रीय स्वरुप दिले आहे. जेव्हा शेतकरी जमिनीवर आपला ताबा सांगू लागला तेव्हा निझामाने केलेल्या अन्यायाचे वर्णन आणणा भाऊंनी पुढील शब्दात केले आहे.

‘‘मोगलाईचे नाव सार्थ ते करिती रझाकार।
स्वातंत्र्य जे जे मागती त्यांना पकडती।
टाचा कापिती अन् चालविते जबरीने।
मागून भाले भोकून मग घेती शेवटी प्राण।’’
(तेलंगणचा संग्राम)

अमळनेर येथे झालेल्या कुप्रसिद्ध हत्याकांडाचे प्रभावी वर्णन ‘अमळनेरचे अमर हुतात्मे’ या पोवाड्यामध्ये केलेले आहे. अमळनेरच्या मिलमधील कामगार शेख नथुलाल या कामगार कम्युनिस्ट कार्यकर्त्याला अचानक कामावरुन कमी केले. त्याला कमी केल्यामुळे कामगार व मालक यांच्यात संघर्ष सुरु झाला. या संघर्षाचे पर्यवसन पुढे संपात झाले. हा संप मोडून काढण्यासाठी कलेक्टरने १४४ कलम जाहीर करुन सभाबंदी, जमावबंदी जाहीर केली. त्यावेळी हा कायदा मोडून काढत कॉ. श्रीपती पाटील या कामगाराने सहा हजार कामगारांचे नेतृत्व करत अमळनेरमध्ये मोर्चा काढला व मुजोर गिरणी मालकाला जाब विचारला, हुकूम मोडून सभा घेतली. या प्रसंगाची सुरुवात आण्णा भाऊ पुढील शब्दात करतात.

"ज्याने लोकशाहीचा हक्कच स्थापायला।
मरणावर केली चाल नाही डगमगला।
दिले मोल जीवाचे ठाकून मैदानाला।
तो शूर श्रीपती पाटील हिम्मतवाला।।"
(अमळनेरचे अमर हुतात्मे)

यावेळी प्रक्षुब्ध जमावावर पोलीसांनी केलेल्या गोळीबारात श्रीपती पाटील, रतन पाटील, गंगाधर भिला पाटील, झुमकीराम मोकल, शंकर मोतीराम, श्रीपती भिला, शंकर धोंडू, सोनुरंगा बन्सी ही अमळनेरच्या कामगार जगतातील नऊ रत्ने ठार झाली. त्यांचे वर्णन

"अमळनेरचे अमर हुतात्मे लाल नऊ तारे।
रक्तामाझी विझले निखारे ते धगधगणारे।।"
(अमळनेरचे अमर हुतात्मे)

१९०८ मध्ये टिळकांना अटक झाल्यानंतर गिरणी कामगारांनी कॉ. डांगे, कॉ. मिरजकर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटित होऊन संप पुकारला आणि मुंबईतल्या ८४ गिरण्या बंद पडल्या. हा १९०८ ते १९५० पर्यंतचा इतिहास "मुंबईचा कामगार' या पोवाड्यातून मांडला आहे. खलाशांनी पुकारलेल्या बंडाला प्रतिसाद म्हणून मुंबईच्या गिरणी कामगारांनी केलेले आंदोलन, पुकारलेला संप याची नोंद ते घेतात. सर्व

दलित-श्रमिक यांना एका झेंड्याखाली येण्याचे आवाहन या पोवाड्यातून केले आहे.

"गिरणी मालक भांडवलदार।
तसेच सरकार। बेदरकार।
कदर मजुरांची मुळी न करता।
पिळून शोषित होते रक्ता।
गाजवीत वरती आपुली सत्ता।"
(मुंबईचा गिरणी कामगार)

१४ ऑगस्ट १९५० रोजी बोनससाठी कामगारांनी पुन्हा संप केला, तेव्हा सरकारने गोळीबार करुन कामगारांचा संप मोडीत काढण्याचा चंग बांधला. त्या गोळीबारात हुतात्मा झालेल्यांची श्रेयनामावली त्यांच्याबद्दल आदर भावे व्यक्त केला आहे.

""गणपत पानसरे मेला। महादेव कुंभार ही गेला।
अन् विठू कृष्णा कदमाला। गोळीनं दगा जाहला।
शिवचरण सुचित ठार झाला। तुकाराम पडला रस्त्याला।
लागली गोळी बाबू रघुनाथरावाला।।
शंकर दाबे, दामाजी केशवही गेला।
अशा बारा वीरांनी रणी देह ठेवला।।"
(मुंबईचा गिरणी कामगार)

आण्णा भाऊंचे हे पोवाडे म्हणजे शेतकरी दलित व कामगार यांच्या जगण्याशी प्रामाणिक राहून केलेले चित्रण आहे. "एकजुटीचा नेता' हे कामगार नेत्यांच्या एकजुटीवरील कामगार गीताची रचना आण्णा भाऊ करतात. हा कामगार दुनिया बदलण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याला स्वत:ची कुटुंबाची कसलीही भ्रांत नाही. अन्यायी, जुलमी सत्तेवर प्रहार करण्यासाठी तो कायम तयार असून त्याने अनेक राजे राजवाडे, साम्राज्ये उलथून टाकली आहेत. "जगातील कामगारांनो एक व्हा!' या सादाला प्रतिसाद देण्यासाठी आण्णा भाऊंनी ही रचना केली असल्याचे यातील आव्हानावरुन स्पष्ट दिसून येते.

**शेतकरी जीवन:**

कामगार आणि शेतकरी हे आण्णा भाऊंच्या आस्थेचे विषय आहेत. संपूर्ण कम्युनिस्ट विचारधारा याप्रमाणे काम करताना दिसते. कोणत्याही साम्राज्याचे कामगार आणि शेतकरी हे फार मोठे घटक ठरतात. तद्वत आण्णा भाऊंनी भारतीय शेतकरी व कामगार या मध्यमवर्गीयांना समोर ठेवून त्यांच्या प्रश्नाविषयी सजगतेने, जाणतेपणाने काव्य रचून परिस्थितीवर मर्मभेदी भाष्य केले आहे. त्यांच्या या परिस्थितीला नेमके जबाबदार कोण हा विचार मांडून लढ्याला प्रेरित केले आहे. "भाग्याची माऊली', "शिवारी चला', "दुनियेची दौलत सारी', "रवि आला लावुनी तुरा', "बोलत कडं कपारी', "तु मराठमोठा शेतकरी' या गीतामधून आण्णा भाऊंनी शेती व शेतकऱ्यांच्या प्रती असणाऱ्या आस्था त्यांच्या प्रश्नांप्रती असणारी जाण, सोडविण्यासाठी सरकारविषयी असणारा रोष पहावयास मिळतो.

आखिल मानव जातीचे पोट भरावयाचे असेल तर शेती पिकली पाहिजे, धनधान्य अधिकाधिक उत्पादित केले पाहिजे यासाठी "शिवारी चला!' अशी साद आण्णा भाऊ घालतात. तर हे अफाट धनधान्य म्हणजे "दुनियेची दौलत सारी' आहे. एकमेकांच्या हातात हात घालून बोलत कडं कपारी शेतीकडे गेले पाहिजेत अशी भूमिका शाहीर घेतात. "रवि आला लावुन तुरा', "पूर्वेला जाग आली' या केवळ शेती कामगार विषयक रचना नसून त्यामध्ये संघर्ष करण्याची सूचकता आहे.

"पुढच्याला ठेच आणि मागच्याला इशारा सावध व्हावे शेजारी, बोलत कडं कपारी!' निवडणुकीच्या काळात काँग्रेससह इतर पक्ष तुमच्या हातावर तुरी देतील म्हणून लाल बावट्याच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहा, एकजुटीने उभे रहा असे सांगण्यासाठीच या रचना केलेल्या आहेत हे लक्षात घ्यावे लागते.

**दुष्काळाचे चित्रण:**

जागतिक विश्वशांतीचा, न्यायाचा दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून, आपल्या प्रतिभेने नवनवीन पोवाडे लिहिणाऱ्या आण्णा भाऊंचा "बंगालची हाक' हा पोवाडा म्हणजे राष्ट्राप्रती असणारा आदर, नीती, श्रद्धाभाव व्यक्त करणारे काव्य होय. निसर्गाच्या दृष्टचक्राचा एक भाग म्हणजे दुष्काळ. बंगालमध्ये दुष्काळ पडला, हाहाकार माजला, जनता उपासमारीने तडफडून मरु लागली. कष्टकऱ्यांच्या हाताला काम मिळेना, माय-बहिणींनी आपले स्वत:चे शील विकूनही मुलाबाळाचे पोट भरता येईना. याचे करुण चित्रण आण्णा भाऊंनी या पोवाड्यातून मांडले आहे.

"भारताचे शूर संतान। अन्ना विण सोडिते प्राण।।
शतकानुशतके ज्याने। गाजविले शौर्य दारुण।।
त्याचा तो देह कोल्ह्यानं। निर्भय केला भक्षण।
त्या वंग वीर मातेनं। भुकेच्या आहारी जावून।।
शील, कूल, मूल विकून। शमविली पोटाची अग्न।।"

(बंगालची हाक)

केवळ दुष्काळाचे चित्रण आण्णा भाऊ करत नाहीत तर त्यावेळी होणारी उपासमारीचे कारण काय? हेही ते तपासून बघतात. दुष्काळाचा फायदा घेऊन शोषण करु इच्छिणाऱ्या व्यापाऱ्यांच्या नांग्या ठेचूया आणि बंगाली माणसाला आपल्या माणुसकीचे दर्शन घडवुया असे आवाहन ते करतात. सर्व समस्येवर उपाय शोधणे, सत्य शोधून त्यावर इलाज सुचवणारे आण्णा भाऊ या पोवाड्यात दिसतात.

"बंगाल मारितो हाका। भारतीय युवका।
उठा आता ऐका। वाचवा त्याला। धरा सावरुन।
निराशा, दुर्बलता झुगारुन।।जी।।"

(बंगालची हाक)

असे कळकळीचे आवाहन पोवाड्याच्या शेवटी ते करतात.

व्यापारी लोक जीवनावश्यक वस्तूंचा साठा करुन त्या वस्तू काळ्या बाजाराने कशा विकतात; या कामी त्यांना नोकरदारवर्ग व राज्ययंत्रणा कशाप्रकारे मदत करते याचे उपहासपूर्ण चित्रण "काळ्या बाजाराचा पोवाडा' या पोवाड्यातून आणणा भाऊंनी केले आहे. वर्तमान काळाला लागू होणाऱ्या या पोवाड्यातून काळा बाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांना धडा शिकवण्याचे आवाहन ते करतात. शोषणमुक्तीचे रणयुद्ध पेटवले पाहिजे असा उपाय सुचवतात..

"काळ्या बाजाराचा रोग आला। मागं लागला।
गोरगरिबाला सुखाचा घास मिळणां झाला,
काळ अतिबिकट आला। वरती बैसले चोर नफेबाज।
करिती ते आज आपुलेकाज। म्हणती देशात आमुचे राज।।
(काळ्या बाजाराचा पोवाडा)

हा पोवाडा रचनेच्या दृष्टीने छोटेखानी पण आशयाने मात्र परिपूर्ण आहे. दुष्काळात नफेबाजांनी केलेला काळाबाजार यामुळे दुष्काळात येणारी गडद दु:खे याचे प्रकट वर्णन आणणा भाऊंनी या पोवाड्यातून केले आहे. या रचना दुष्काळासारख्या वाईट परिस्थितीतही स्वार्थी लोक कशाप्रकारे जनतेला नाडतात याचे करुण चित्रण या रचनांतून आले आहे.

आण्णा भाऊंचे लेखन हे समकाळाशी एकरुप होणारे आहे. इतिहासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास आणि त्याचा आण्णा भाऊंना असणारा अभिमान त्यांच्या प्रत्येक रचनेतून दिसून येतो. त्यात आंतरराष्ट्रीय प्रश्नांची जाण दिसते. गुलामगिरीची, दास्याची चिड व्यक्त करणारे लेखन आण्णा भाऊंनी केले. वेगवेगळे जीवन अनुभव याचे चित्रण केले.

भाषिक प्रगल्भता, जिवंतपणा, मांडणीचा समतोल, प्रतिमांची उधळण, उदात्त जीवनमूल्ये, विचारांचे दर्शन त्यांच्या पोवाड्यातून घडते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, नीतीपर, आंतरराष्ट्रीय स्तरावरचे प्रश्न व त्यांचा वेध घेण्याची क्षमता आण्णा भाऊंच्या शाहिरीत आहे.

**संदर्भ :**

1. डॉ.लोंढे मोहन गोविंद ,डॉ.गायकवाड सयाजीराव छबुराव (संपा.)लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी वाडमय (पोवाडा,लावणी,कवने,लोकनाट्य)ज्ञानमंगल प्रकाशन वितरण सोलापूर आवृत्ती पहिली इ-बुक २०२०